# विषय : साहित्यविचार (एस. २)

## प्रकरण पहिले : साहित्याचे स्वरूप आणि प्रयोजन

### साहित्याचे शब्दरूप

**शब्द हे साहित्याचे मूलद्रव्य आहे.** मूलद्रव्य म्हणजे कलावंत वापरत असलेली प्राथमिक सामग्री होय. **उदा.** चित्रकार रंगाची, शिल्पकार पाषाणाची किंवा संगीतकार नाद वा स्वर या मूलद्रव्याची योजना करीत असतो. साहित्याचा विचार करताना कवी किंवा लेखक आपल्या **अनुभवांची पुनर्निर्मिती शब्दांच्याच आधारे** साधताना दिसतो. त्यामुळे शब्द या घटकाला साहित्याच्या विश्वात अनन्यसाधारण स्थान असते. अर्थात केवळ शब्दांना शब्द म्हणून साहित्यात स्थान असत नाही. तर संपूर्ण अभिप्रायाच्या आविष्कारासाठी त्याचे विशिष्ट **भाषेत रूपांतर व्हावे** लागते.

**'सोस्यूर'** या चिन्हार्थशास्त्रज्ञाच्या मते, **'मानवी भाषा ही एक प्रकारची चिन्हव्यवस्था असून, शब्द हा तिचा लघुत्तम घटक होय'.** या 'भाषिक चिन्हाला' (म्हणजे शब्दाला) दोन रूपे असतात. एक **ध्वनिरूप** (sound image) आणि दुसरे **अर्थरूप** (concept). **उदा. 'झाड'** या शब्दाचे (उच्चारित) 'ध्वनिरूप' हे विशिष्ट 'अर्थरूपा'चा निर्देश करते. ही दोन्ही रूपपदे एकवटून जे तिसरे पद सिद्ध होते, ते 'भाषिक चिन्ह' म्हणजे 'शब्द' होय. 'सोस्यूर' या ध्वनिरूपाला **चिन्हक,** अर्थरूपाला **चिन्हार्थ** आणि ही दोन्ही मिळून बनते, ते **चिन्ह** असे म्हणतो.

शब्दांची ही दोन्ही रूपे (म्हणजे **ध्वनिरूप आणि अर्थरूप**) भारतीय परंपरेतील संस्कृत समीक्षकांनी लक्षात घेतलेली होती. कारण याची चर्चा करताना त्यांनी नुसता 'शब्द' अशी संज्ञा वापरलेली नसून **'शब्दार्थ'** अशी संज्ञा वापरलेली आहे. 'शब्दार्थ' ही संज्ञा उघडपणे शब्दाचे ध्वनिरूप आणि त्याने सूचीत होणारे अर्थरूप स्पष्ट करणारी आहे.

ललितसाहित्याचे स्वरूप स्पष्ट करताना या संस्कृत समीक्षकांनी **शरीर व आत्मा** यांची परिभाषा वापरलेली आहे. आत्म्याचा **आविष्कार** जसा शरीराद्वारे होतो तसा काव्यसौंदर्याचा आविष्कार शब्दार्थाद्वारे होत असतो. म्हणजेच साहित्यातील शब्द नुसते स्थूल अशा व्यावहारिक अर्थाचे वाहक नसतात, तर त्याहून अधिक अशा सूक्ष्म छटांनी युक्त असलेल्या आशयाचे ते वाहक असतात; याची जाणीव जुन्या संस्कृत समीक्षकांना होती असे दिसते.

HRM MARATHI SDS

साहित्य ज्या शब्दांच्या आधारे मूर्त होते, त्या शब्दांबद्दल अनेक जुन्या संस्कृत समीक्षकांनी विचार मांडले आहेत. त्यातील काही विचार किंवा नोंदी या ललित साहित्याच्या व्याख्याच आहेत, त्या पुढीलप्रमाणे –

**भामह** – 'शब्द आणि अर्थ यांचे सहितत्त्व म्हणजे काव्य.'

**दण्डी** – 'इष्ठ अर्थाने युक्त असलेली पदावली म्हणजेच काव्यशरीर.'

**वामन** – 'रीती म्हणजे विशिष्ठ गुणांनी युक्त अशी पदावली.'

**रूद्रट** – 'खरोखर शब्द आणि अर्थ म्हणजे काव्य.'

**जगन्नाथ** – 'रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्दार्थ म्हणजे काव्य.'

या संस्कृत समीक्षकांप्रमाणेच काही पाश्चात्य समीक्षकांचे शब्दाबद्दलचे विचार पाहण्यासारखे आहेत.

**कोलरिज** – The best words in best order (उत्तम क्रमात योजलेले उत्तम शब्द.)

**वर्ड्स्वर्थ** – The spontaneous overflow of powerful feelings (उत्स्फूर्त शक्तीयुक्त वजनदार भावनिक शब्दांची रचना.)

**कार्लाईल** – Poetry is musical thought (संगीतमय विचार म्हणजे काव्य.)

**जॉन्सन** – Poetry is musical composition (नादयुक्त संगीतमय रचना.)

तेव्हा संस्कृत आणि इंग्रजी व्याख्यांवरून असे दिसते की, ललितसाहित्याचे **शब्दरूपत्व ध्यानी घेऊन त्यातील शब्द** व अर्थाचा विचार अनेक समीक्षकांनी केलेला आहे. त्यात **शब्दांना होणाऱ्या प्रतिभेच्या स्पर्शाचे महत्त्व** सर्वत्र मानले गेले आहे. साहित्याच्या माध्यमातूनही **शब्दाला खूप मोठे महत्त्व** प्राप्त झालेले आहे; असे दिसून येत आहे.

## ललित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवाचे विशेष लिहा.

अनुभव या संकल्पनेत संवेदना, भावना आणि विचार हे तीन घटक सामावलेले दिसतात. अशाच अनुभवाला साहित्यातून शब्दरूप लाभत असते. हा अनुभव लेखनातून प्रकट होताना नुसता अनुभव न राहता त्याच्यावर होत असलेल्या संस्करणामुळे तो साहित्यानुभव बनतो. त्यामध्ये वास्तव आणि कल्पित यांच्या परस्पर संबंधासोबत संवेदनात्मकता, भावनात्मकता, वैचारिकता, सेंद्रियता, सूचकता, विशिष्टता आणि विश्वात्मकता इ. वैशिष्टे लाभत असतात. ती पुढीलप्रमाणे :

HRM MARATHI SDS

## ललित साहित्यकृतीतील वास्तव व कल्पित यांचा संबंध

साहित्याचे विश्व हे पूर्णपणे **कल्पित विश्व आहे की वास्तव** हा जुन्या काळापासून चालत आलेला वाद आहे. साहित्य ही पूर्णपणे एका व्यक्तीमनाची नवनिर्मिती असून, तिचे मूल्यमापन करताना तिचे केवळ कलात्मक रूप लक्षात घ्यावे अशी भूमिका **कलावादी** लोक मांडतात. तर कलारूपातही जीवनमूल्यांची उपस्थिती आवश्यक मानणारा **जीवनवादाने विचार करणारी लोकं** अस्तित्वात आहेत. खरे तर लेखकाकडून होणारे लेखन हे सर्वस्वी त्याच्या अनुभवविश्वावर आधारलेले असते. आणि त्याने हे अनुभव त्याच्या जीवनातून वेचलेले असतात. अर्थात जीवनातील अनुभव लेखक जसेच्या तसे मांडत नाही तर स्थलकालबद्ध असलेल्या जीवनानुभवांना तो **कल्पना वा प्रतिभेच्या साह्याने नवा संदर्भ** देत असतो. या अनुभवातील मूळ घटकांची फेररचना करून त्यातून नवा रूपबंध सजत जात असतो. ही **कल्पिताच्या जोरावर वास्तवाचीच** केली जाणारी फेरमांडणी असते.

मराठीत हरिभाऊ आपटे यांच्या सामाजिक कादंबऱ्या हे याचे उत्तम उदाहरण आहे. **'पण लक्षात कोण घेतो'** या सारख्या कादंबऱ्यांतून त्यांनी गेल्या शतकाअखेरच्या स्थितिशील, रूढिग्रस्त, मध्यमवर्गीय स्त्रीजीवनाचे भेदक चित्रण केले. त्यांच्या लेखनातून 'प्रत्यक्ष' अनुभवांना वास्तवाची पातळी लाभते. त्यांना त्यांचा स्वत:चा असा खास अर्थ प्राप्त होतो. स्वतंत्र संदर्भ लाभतो आणि ते सर्वांचे बनतात. हे जे सारे घडते ते हरिभाऊंच्या ठिकाणी किंवा कोणत्याही लेखक – कवीच्या ठिकाणी असणाऱ्या प्रतिभाशक्तीमुळे. लेखक – कवी हा तुमच्या आमच्या सारखा असतो. फक्त जीवनाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन **व्यवहारवादी** असतो तर जीवनातील **सौंदर्य टिपण्याकडे** लेखकाचा कल असतो. उदा. ग. दि. माडगुळकरांच्या कवितेच्या बाबतीत आपल्याला तसाच अनुभव येतो.

''कोण्यात झोपली सतार सरला रंग । पसरली पैंजणे सैल टाकूनी अंग ।।
गालिचे दुमडले । तक्ते झुकले खाली । तबकात राहिले देठ – लवंगा साली ।।''

या काव्यपंक्ती वाचल्यानंतर आपले मन एका वेगळयाच वातावरणात म्हणजेच नाचगाण्यांची मैफील झाल्यानंतर एका नर्तकीच्या मनातील भावावस्थेपर्यंत जाऊन पोचते. ही स्थिती जरी 'वास्तव' असली तरी 'कल्पनेचा' मुलामा देऊन कवीने तिला जीवनव्यापी बनविली आहे. कोणताही कलावंत साहित्यनिर्मिती करीत असताना

HRM MARATHI SDS

आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर त्या वास्तवाला सजीव करीत असतो. जेव्हा साहित्याचे स्वरूप पूर्णपणे कल्पित नसते. त्याला वास्तवाचा आधार असतो / असावा लागतो.

या संदर्भात **वा.ल.कुलकर्णी** यांच्या मते **जीवन आणि साहित्याची सृष्टी** यांचा संबंध माता आणि तिच्या उदरात वाढणारा गर्भ यांच्यात असणाऱ्या संबंधाप्रमाणे असतो. गर्भ मातेच्या उदरात वाढतो, त्या उदरातून लाभणाऱ्या जीवनरसावर त्याचे पोषण होते हे खरे, पण त्या गर्भाचे अस्तित्व स्वतंत्र असते, स्वायत्त असते. **मानवी जीवन हे मातेप्रमाणे असून साहित्याचे विश्व तिच्या उदरात वाढणाऱ्या गर्भासारखे आहे. या साहित्यविश्वाचे अस्तित्व स्वतंत्र असले तरी त्याचे पोषण मात्र जीवनातून प्राप्त होणाऱ्या अनुभवरूपी रसातून होते. या अर्थाने हे रूपक अधिक अर्थपूर्ण असून साहित्यामध्ये वास्तव आणि कल्पित यांचा परस्परसंबंध नेमकेपणाने स्पष्ट करणारे आहे.**

**संवेदनात्मकता :**

संवेदनात्मकता हा कलात्मक अनुभवाचा प्रधान विशेष आहे. कोमल भावना ग्रहण करण्याची अथवा त्यांना प्रतिसाद देण्याची क्षमता तसेच इतरांच्या भावनांशी एकरूप होण्याची आणि संवाद साधण्याची क्षमता या अर्थाने 'संवेदनात्मकता' या संकल्पनेचा विचार केला जातो. कलादृष्टीने रूप, स्पर्श व नाद या संवेदना अधिक महत्त्वाच्या असतात. साहित्यकलेमध्ये रूप, नाद, स्पर्श याशिवाय रस आणि गंध यांचाही प्रत्यय येऊ शकतो. वर वर पाहता शब्द हे साहित्यकलेचे माध्यम श्रवणाचा विषय ठरतो. पण केवळ लिखाणातील शब्दांच्या स्वरूपाचा किंवा श्रवणाचा साहित्यात आस्वाद घेतला जात नाही तर शब्दांचे आवाहन पंचेंद्रियांना असते. अशा संवेदना नेमकेपणाने टिपणारा आणि हळूवारपणे रसिकांपर्यंत पोचवणारा कलावंत मोठा मानला जातो. मराठी कवितेतील बालकवींचे या बाबतीतील कौशल्य विषेष उल्लेखनीय आहे. कलाकृतीत चैतन्य आणि जिवंतपणांचे अस्तित्व प्राधान्याने संवेदनांच्या पातळीतच सामावलेले असते. बालकवींच्या कवितेत सूक्ष्मातिसूक्ष्म संवेदना शब्दाधारे टिपण्याचे असाधारण कसब दिसून येते.

**भावनात्मकता :**

भावनात्मकता हा ही अनुभवाचा विशेष आहे. अनुभवात असणारा भावनेचा स्पर्श वैशिष्ट्यपूर्ण असतो. हा अनुभव काही विशिष्ट भावनांची जागृती करू शकतो. भावनात्मता फक्त व्यावहारिक पातळीवर नसते म्हणजे जीवनोपयोगी आणि कृतिप्रवण नसते. भावनेसाठी भावना असे तिचे स्वरूप असल्याने ती आस्वादपर असते.



HRMMARATHISDS

व्यवहारी जगात संकटात सापडलेल्या माणसाला आपण मदतीचा हात देऊ शकतो. परंतु साहित्यातील एखाद्या व्यक्तीस उदा. 'एकच प्याला' मधील सिंधुला आपण साहाय्य करू शकत नाही. किंवा 'ऑथेल्लो' नाटकातील निष्पाप पत्नीचा खून करणाऱ्या ऑथेल्लोबद्दल कितीही संताप वाटला तरी आपण काही करू शकत नाही. कारण साहित्यकृतीतील व्यक्तिरेखांना वास्तव जगात तुमच्या आमच्यासारखे अस्तित्व नसते. मात्र हा अनुभव घेत असताना वाचकांच्या मनात भावना जागृत होणे सहाजिक असते. त्यामुळे आपल्या जीवन जाणिवा प्रगल्भ आणि समृद्ध करण्याचे कार्य या प्रकारच्या भावनात्मकतेमुळे साधले जाते.

**वैचारिकता :**

वैचारिकतेचे स्थान ज्ञानाशी संबंधित असल्याने ते शास्त्रीय वाङ्मयात असते, असे म्हटले जाते. परंतु ललित साहित्यालाही विचारांचे वावडे नसते. उदा. हरिभाऊ आपटयांची सामाजिक कादंबरी, केशवसुतांची कविता, विजय तेंडूलकरांची नाटके इत्यादि. यावरून असे दिसते की, या कलाकृती काही एक निश्चित विचार, वैचारिक दृष्टीकोन आपल्याला देतात. त्यांचे साहित्य आपल्याला आनंदाबरोबर विचारही देत असते. याचे कारण एकच, त्यामागील अनुभवात असलेला विचारांचा घटक होय. तेथे विचार हा घटक वैचारिक पातळीवर न राहता तो कलेच्या पातळीवर गेलेला दिसतो. त्यामुळेच वैचारिकता हे ही साहित्या एक विशेष आहे.

**सूचकता :**

सूचकता हा ही कलात्मक अनुभवाचा एक महत्त्वपूर्ण विशेष मानला जातो. ललित साहित्यातून बरेचसे व्यक्त केले जाते आणि खूप काही सूचीत केले जाते. 'सूचकता' हे साहित्यकृतीचे जीवित असते अशा अर्थाने संस्कृत मीमांसक **'आनंदवर्धन' याने 'ध्वनी'** हा शब्द वापरला आहे. लेखक आपल्या साहित्यकृतीत जे शब्द वापरतो, त्यातून लेखकाला केवळ त्या शब्दांचे अर्थ सूचवायचे नसतात तर त्यापेक्षा अधिक काहीतरी सांगायचे असते यालाच सूचकता अथवा ध्वनित असे म्हणतात. संस्कृतातील 'ध्वनिविचार' या विशेषाचेच महत्त्व सांगतो. साहित्यकृतीतून काहीतरी सूचीत होत असते. ते जाणून घेण्याची ताकद वाचकाजवळ असायला हवी. त्यातूनच साहित्यकृतीचे श्रेष्ठत्व ठरत असते. जितके साहित्यकृतीतून जास्त अर्थ सूचीत होतील तितके त्या साहित्यकृतीचे मूल्य अधिक असते.

उदा. वि.वा.शिरवाडकरांच्या 'नटसम्राट' नाटकामध्ये 'आप्पा बेलवणकर' आपली सर्व संपत्ती आपल्या दोन मुलांमध्ये वाटून देतात आणि या कृतीबद्दल आपल्या बायकोचे मत विचारतात. तेव्हा त्या म्हणतात, **'पुढचं**

**वाढलेलं ताट द्यावं, पण बसायचा पाठ देऊ नये माणसानं'** या त्यांच्या बोलण्याचा सूचीत अर्थ खूप बोलका आहे. पाठ हा माणसाच्या बसण्याचा आधार असतो आणि तोच देऊन टाकला तर माणसाने उभं राहायचे कशावर? अशा प्रकारचे वाक्य बरीच वर्षे संसार केलेल्या गृहिणीच्या तोंडून जेव्हा बाहेर पडतं, तेव्हा ते बरेच काही सूचवून जाते.

साहित्यकृतीचे साहित्यमूल्य वाढवण्याच्या दृष्टीने अशी सूचकता फार उपयुक्त ठरते. मात्र शास्त्रीय वाङ्मयाच्या बाबतीत हीच 'सूचकता' घातक ठरण्याची शक्यता अधिक असते.

**सेंद्रियता :**

**ॲरिस्टॉल यांनी सजीव शरीराप्रमाणे कलाकृतीची रचना हवी,** असे मत मांडताना कलाकृतीच्या सेंद्रियत्वाची कल्पना मांडली. अनेकविध अवयवांच्या चैतन्यमय एकत्रीकरणातून मानवी शरीराची जशी एकात्म संघटना संभवते तशीच **भावना, कल्पना, विचार, शब्दार्थ** या घटकांच्या आधारे एकात्म भाषिक संघटना म्हणजे साहित्यकृती असते. उदा. आपण जेव्हा एखादी कलाकृती वाचतो तेव्हा आपल्या मनाला संवेदना जाणवतात. त्या केवळ संवेदना नसतात तर त्या कलाकृतीतील **भावना, विचार, शब्द, अर्थ, प्रतिभा** या सारख्या अनेक घटकांचे ते एकसंघ विश्व आपण अनुभवत असतो. समजा, **तुमच्या हाताला कोणी चिमटा घेतला** तर त्याची जाणीव केवळ हातापुरतीच राहत नाही तर ती सर्व अवयवांना होऊन मनापर्यंत जाऊन पोचते. सर्व इंद्रियांवर त्या चिमटयाचा एकसंघ परिणाम होतो. बालकवींच्या 'औदुंबर' कवितेबद्दलही असेच म्हणता येईल.

**'ऐलतटावर पैलतटावर हिरवाळी घेऊन । निळा सावळा झारा वाहतो बेटाबेटातून'**

ही ओळ वाचता वाचता त्या शब्दामागून आपले नुसते डोळे फिरत नसतात तर त्या शब्दातला अर्थ, ते दोन तट, त्यावर पसरलेली हिरवळ, बेटाबेटातून वाहणाऱ्या झऱ्याची गती, त्याचा निळा सावळा रंग या सर्वांनी आपल्या इंद्रियांना सचेतन केलेले असते. या सर्व इंद्रियांना जाणवनारा एकसंघ परिणाम आपल्याला होणाऱ्या आनंदातून मिळतो.

**साहित्यकृती अनेक घटकातून जन्म घेते.** तिचा प्रत्येक घटक सुटा सुटा करून टाकता येत नाही किंवा त्याचा स्वतंत्र विचार करता येत नाही. उदा. एखाद्या कादंबरीत कथा, व्यक्तिदर्शन, प्रसंगचित्रण, वातावरण, भाषा इ. घटक संपूर्ण कादंबरीत एकच एक असा एकात्म संस्कार करतात. तसेच कवितेतील **एक एक कडवे**

स्वतंत्रपणे वेगळे करून तिचा विचार करता येत नाही. कवितेतील सर्व कडव्यांचा एकसंघ अनुभव आपण अनुभवतो. त्यातील एखादे कडवे बाजूला काढून ठेवता येत नाही. कारण त्यामुळे कवितेचा तोल बिघडेल. उदा.

**'खळखळू द्या अद्य शृंखला हातापायात । पोलादाची काय तमा मरणाच्या दारात'**

या ओळीतील **'शृंखला'** हा शब्द बदलून त्या जागी **'साखळया'** हा त्याच अर्थाचा व वृत्तदृष्टया फारसा बदल नसणारा शब्द घालून चालेल काय? याचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागते. शृंखलाचे साखळया केले तर पुढच्या पोलाद या शब्दाचा आवेग बदलेल.

साहित्यकृतीच्या अनेक घटकातून एकच परिणाम साधला जातो. म्हणजे **अनेकत्वापासून एकत्वाचा** अनुभव वाचकाला मिळत असतो. म्हणून साहित्यकृती ही एक बांधेसुद आकृती असते तसेच ती सेंद्रिय चैतन्यशील असते, असे म्हणावे लागते.

**साहित्यकृतीची विशिष्टता आणि विश्वात्मकता :**

हे दोन्ही तर केवळ साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांचे विशेष म्हणता येतील असे आहेत. **शास्त्रीय वाङ्मयाच्या अनुभवात फक्त विश्वात्मकता** हा विशेष असतो. कारण तो **शोधणाऱ्याच्या विशिष्टत्वाचा** ठसा उमटलेला नसतो. तो अनुभव सर्वार्थाने सर्वांचा असतो. **उदा. न्युटनने मांडलेला गुरूत्वकर्षणाच्या सिद्धांतामागील अनुभव विश्वात्मक असतो. पण साहित्यामागील अनुभव व्यक्तिसापेक्ष असुनही व्यक्तिनिरपेक्ष होत असतो.**

साहित्यातून जो अनुभव व्यक्त होतो, तो लेखकाचा अनुभव असतो. तसेच तो रसिकालाही आलेला अनुभव असतो. **तो पुनर्निर्मिती करण्याच्या पातळीवर पोचण्याइतका श्रेष्टही असू शकतो.** जीवनानुभवापेक्षा साहित्यानुभव वेगळा असतो. लेखकाने आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्यावर त्या जीवनातील अनुभवाला कलारूप दिलेले असते. या कलारूपामध्ये कलावंताचा स्वत:चा अनुभव, संस्कार, बुद्धिमत्ता इ. अनेक गोष्टींचा संगम झालेला असतो.

उदा. अरूण साधू यांनी दुष्काळाचे चित्रण करणारी **'शापित'** नावाची कादंबरी लिहिली. परंतु त्यांनी जशी पाहिली, अनुभवली तशी दुष्काळाची स्थिती जशीच्या तशी चित्रीत केली नाही. तर लेखकाचा प्रत्यक्ष अनुभव, जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, त्यांचे मानवी मनाचे आकलन इ. अनेक गोष्टींचे मिश्रन या 'शापित' कादंबरीत उतरले आहे. त्यामुळे ही कादंबरी सर्वच दुष्काळग्रस्तांची होऊन जाते. ही दुष्काळी परिस्थिती कोणी

अनुभवलेली, कोणावर येत असलेली तर कोणावर येणार असते. म्हणून ही विशिष्ट साहित्यकृती विश्वात्मक बनते.

**'पुत्रकामेष्ठी'** नाटकात मूल न होणाऱ्या स्त्रीचे दु:ख दाखविले आहे. हे दु:ख वैयक्तिकरित्या त्या स्त्रीचे असले तरी ते विश्वात्मक पातळी गाठते. कारण समाजात मूल न होणाऱ्या स्त्रियांचीही संख्या मोठी आहे. त्या सर्वांचे ते दु:ख बनते.

**'अष्टविनायक'** चित्रपटात लग्न होऊन मुलगी सासरी जाण्याचा प्रसंग आहे. तेव्हा 'दाटून कंठ येतो जा सासरी सुखाने' असे गीत गाणारे वडील पाहताना प्रत्येक मुलगी असणाऱ्या वडिलांच्या डोळयात अश्रू अभे राहतात. हीच त्या कलाकृतीची विश्वात्मकता ठरते.

लेखक आपल्या वैयक्तिक जीवनामध्ये आलेल्या अनुभवावर काही संस्कार करून, कल्पना करून त्याचे साहित्यकृतीत रूपांतर करीत असतो. उत्तम कलावंताच्या साहित्यकृतीतील अनुभव व्यक्ती–स्थळ–काळसापेक्ष न राहता तो जीवनव्यापी होतो. विश्वात्मक पातळी गाठतो. विशिष्ट व्यक्तीने निर्माण केलेली व्यक्तिरेखा त्या व्यक्तीपुरतीच मर्यादित न राहता त्यात आलेल्या घटना – प्रसंगांमुळे विश्वात्मक पातळीपर्यंत पोचते.

**सारांश – उत्तम साहित्यकृतीतून व्यक्त होणारा अनुभव हा एकाच वेळी विशिष्ट असतो व त्याच वेळी तो विश्वात्मकही असतो.**

HRM MARATHI SDS

## साहित्याचे प्रयोजन स्पष्ट करा.

**प्रयोजन म्हणजे काय?** :

प्रयोजन म्हणजे कोणत्याही कृतीमागील **हेतू किंवा उद्देश.** प्रयोजन या संज्ञेला हेतू, उद्दिष्ट, साध्य अशा अनेक संज्ञा वापरल्या जातात. **एखाद्या वस्तूचे प्रयोजन म्हणजे त्या वस्तूकडून साधले जाणारे कार्य किंवा तिचा वापर होय.** कर्त्याच्या मनात विशिष्ट कार्यसिद्धीमागे जे उद्दिष्ट असते; तेच प्रयोजन होय. मानवी कृतींची संगती लावण्यासाठी प्रयोजन ही संकल्पना महत्त्वाची आहे. **मानवनिर्मित घटना ह्या सहेतुक असतात.** माणसाच्या प्रत्येक कृतीमागे कोणता तरी हेतू असतो. मानवाकडून झालेल्या प्रत्येक निर्मितीचा **व्यावहारिक आणि कला** अशा दोन्ही पातळयांवर विचार करता येतो. **व्यावहारोपयोगी वस्तूंच्या बाबतीत प्रयोजनाचा विचार सरळ असतो. उदा.** सौंदर्यप्रसाधणांची निर्मिती व स्वीकारामागे 'शरीरसौंदर्याची खुलावट साधण्यासाठी' असे प्रयोजन चटकन सांगता येते. परंतु कला – साहित्याच्या निर्मितीमागील प्रयोजनाबाबत असे चटकन उत्तर देता येत नाही. **साहित्याचा विचार करताना निर्माता कलावंत, कलाकृती आणि आस्वादक रसिक अशा तीन अंगांनी विचार केला जातो.** कलावंताचे निर्मिती प्रयोजन, रसिकाचे कलानुभवाचे प्रयोजन व कलाकृतीचे प्रयोजन या तिन्हींचा एकत्रित विचार करताना साहित्याच्या प्रयोजनाचा प्रश्न निर्माण होतो.

**साहित्याचे प्रयोजन म्हणजे काय?** :

लेखक – कवी साहित्यनिर्मिती करण्यास कोणत्या उद्देशातून प्रवृत्त होतो आणि वाचक कोणत्या हेतूने त्या कलाकृतीचा आस्वाद घेतो, या अर्थाने **'साहित्याचे प्रयोजन'** या प्रश्नाचे स्वरूप बनते. या प्रश्नाचे एकच एक उत्तर नसल्याने किंबहुना नेमके उत्तर गुंतागुंतीचे असल्याने भारतीय व पाश्चात्य समीक्षकांनी याबद्दल बरीच सखोल चर्चा केली आहे. **साहित्याचे प्रयोजन काय?, साहित्याचे प्रयोजन एक की अनेक?, साहित्य प्रयोजने काळानुरूप बदलतात का?, साहित्याच्या स्वरूपावरून प्रयोजन बदलते का?** हे आणि असे अनेक प्रश्न प्राचीन आणि आधुनिक साहित्यशास्त्रात सातत्याने चर्चिले गेले आहेत. प्लेटो, ॲरिस्टॉटल या पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांपासून आपल्याकडील भरत, अभिनवगुप्त, मम्मट या संस्कृत मीमांसकांपर्यंत अनेकांनी आपापल्या जीवनविषयक दृष्टिकोनानुसार साहित्याची प्रयोजने निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. स. रा. गाडगीळ यांनी संस्कृत व पाश्चात्य साहित्यशास्त्रज्ञांनी सांगितलेल्या प्रयोजनांचा सारासार विचार केला आहे. **''रसिकाला शुद्ध सौंदर्यानुभव देणे येथपासून मानवी जीवनाचा अर्थ काय?, मानवी जीवनात ललितकलांचे – साहित्याचे स्थान कोणते?**

HRMMARATHISDS

**यासारखे प्रश्न उपस्थित करून वाचकाला एक नवी जीवनदृष्टी देणे, त्याची जीवनानुभूती समृद्ध करणे, त्याला चिंतनप्रवण करणे, सामाजिक क्रांतीला सहाय्यक होणे, आणि शेवटी अंतिम सत्याचा – परतत्त्वाचा साक्षात्कार घडवून आणणे हेच श्रेष्ठ साहित्याचे प्रयोजन आहे.''** असे सांगताना स. रा. गाडगीळ यांनी **कलावाद आणि जीवनवाद** अशा दोन्ही भूमिकांनी साहित्य प्रयोजनांचा विचार केला आहे. साहित्य प्रयोजनांची चर्चा करताना संस्कृत मीमासंक **मम्मट यांनी 'यश', 'द्रव्यलाभ', 'व्यवहारज्ञान', 'अशुभनिवारण', 'उच्चतर आनंद' आणि 'पत्नीप्रमाणे प्रेमळ उपदेश' ही प्रयोजने सांगितली** आहेत. ती काही प्रमाणात यथार्थ वाटतात. याशिवाय **'इच्छापूर्ती', 'जिज्ञासापूर्ती', 'विरेचन', 'आत्माविष्कार', 'अनुभवविश्वाची समृद्धी', 'स्वप्नरंजन', 'उद्बोधन', 'प्रचार', 'मनोरंजन' आणि 'आनंद' ही साहित्याची प्रयोजने** सांगितली गेली आहेत.

**मम्मट यांची साहित्य प्रयोजने :**

संस्कृत मीमांसक भरत, दण्डी, आनंदवर्धन, कुंतक, हेमचंद्र, भामह, अभिनवगुप्त, रूद्रट यांनी कवीसंबंद्ध व रसिकसंबंद्ध असा प्रयोजनविचार मांडला आहे. मम्मट या संस्कृत मीमांसकाने **'काव्यप्रकाश'** या आपल्या ग्रंथात पूर्वसूरींनी सांगितलेली काव्यप्रयोजने एकत्रित करून मांडली आहेत. मम्मट म्हणतो,

'काव्यं यशसे अर्थकृत्ये व्यवहारविदे शिवेतरक्षतये।

सद्य:परनिर्वृतये कान्तासंम्मितयोपदेशयुजे ॥'

मम्मटाच्या या संस्कृत 'श्लोका'वरून त्याने सांगितलेल्या काव्यप्रयोजनांचे स्पष्टीकरण 'वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश' या ग्रंथात दिले आहे. ''काव्य हे कीर्तीला कारण होते; द्रव्यप्राप्तीला कारणीभूत होते; व्यवहाराचे ज्ञान करून देते; अमंगल निपटून टाकते; तत्काळ परमानंदाचा लाभ करून देते; आणि कांतेशी तुलावे अशा रीतीने उपदेशाची जोड करून देते.'' यानुसार मम्मटांनी 'यश', 'द्रव्यलाभ', 'व्यवहारज्ञान', 'अशुभनिवारण', 'उच्चतर आनंद' आणि 'कांतेप्रमाणे (पत्नी) उपदेश' अशा सहा काव्यप्रयोजनांचा निर्देश केलेला आहे. मम्मटाच्या प्रयोजनांचे वैशिष्टे म्हणजे हा प्रयोजनविचार कवी आणि रसिक अशा दोन्ही अंगांनी केला गेला आहे. यापैकी **यश, द्रव्यलाभ, व्यवहारज्ञान ही कविसंबंद्ध, अशुभनिवारण, परम आनंद आणि पत्नीचा प्रेमळ** उपदेश ही रसिकसंबंद्ध प्रयोजने सांगितली आहेत. संस्कृत साहित्य प्रयोजनविचारात मम्मटाची प्रयोजने प्रमाणभूत मानली जातात.

**यश :**

मम्मटाच्या 'यश' या प्रयोजनाचा अर्थ कीर्ती असून काव्यलेखनामुळे कवीला प्रसिद्धी, मानमरातब, मान्यता लाभते असे हे प्रयोजन मानते. मम्मटाने ज्या काळात हे प्रयोजन मांडले; त्या काळात अनेक जण राजकवी अथवा राजमान्यतेसाठी प्रयत्नशील असणार. आजही अनेक लेखक कवींना शासनदरबारी पुरस्कार मिळण्याची अपेक्षा असते. त्यातून त्यांना 'यश' किंवा 'कीर्ती' प्राप्त झाली; असे वाटते.

परंतु एका मर्यादेपर्यंतच काव्यलेखनाचे प्रयोजन म्हणून 'यशा'चा विचार करता येईल. कारण 'यशा'चा साहित्याच्या निर्मितीहेतूशी काहीच संबंध नाही. तसेच एकूणच साहित्यनिर्मिती प्रसिद्धीसाठी होते असे म्हणणे योग्य होणार नाही. मध्ययुगीन काळात संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत तुकाराम आणि आधुनिक काळातील केशवसुत, बालकवी, कुसुमाग्रज इत्यादी कवींनी फक्त यशासाठी काव्यलेखन केले असे म्हणता येणार नाही. याउलट नव्या वळणाचे, परंपरेपेक्षा वेगळे लेखन केल्यामुळे संत तुकारामांना जीवघेणा त्रास सहन करावा लागला. मुक्त प्रेमकाव्य लेखनामुळे कवी माधव ज्युलियन यांना 'प्रणय पंढरीचा वारकरी' असे कुचेष्टेने म्हटले गेले. याचा अर्थ त्यांना उलटया अर्थाने प्रसिद्धी मिळाली. मात्र ते लिहित राहिले आणि पुढे त्यांनी आपल्या लेखनाला प्रतिष्ठा मिळवून दिली. या अर्थाने 'यशा'चा विचार करता येईल. स. रा. गाडगीळ यांनी ''कोणत्याही मानवी कर्तृत्वामागे कीर्तीची प्रेरणा अप्रत्यक्षपणे असतेच. मानवी प्रवृत्तीचाच हा विशेष आहे. एवढया मर्यादित अर्थाने 'कीर्ती' या प्रयोजनाचे अस्तित्व मान्य करावयास हरकत नाही'' असे सांगितले आहे. तेव्हा 'यश' हे प्रयोजन एका मर्यादेपर्यंत मान्य करावे लागेल. वाटल्यास त्याला पुरक प्रयोजन म्हणता येईल.

वाचकाच्या बाजूनेही 'यश मिळविण्यासाठी वाचन' असे म्हणता येईल. खूप आणि चिकित्सक वाचनाने आपल्या अनुभवात भर पडते. विपुल माहिती संग्रही राहते. बहुश्रुतता प्राप्त होते. दृष्टी व्यापक होते. स्वत:ला आनंद मिळतो तसा तो दुसऱ्यालाही देता येतो. पण असा लौकिक मिळविण्यासाठी वाचक साहित्याचे वाचन करतो, असे म्हणता येणार नाही. तो वाचनाची आवड म्हणून वाचतो आणि वाचनामुळे त्याला मान मिळतो. हा वाचनाचा लाभ आहे. ते वाचनाचे प्रयोजन म्हणता येणार नाही.

**अर्थप्राप्ती**

कवीला प्रसिद्धी बरोबर 'अर्थप्राप्ती' होते असे हे प्रयोजन मानते. प्राचीन व मध्ययुगीन काळात अनेक कवींना राजाश्रय लाभत असे. त्यातून त्यांना वेगवेगळे पुरस्कार, अर्थसाहाय्य लाभत असे. कलावंताने



HRM MARATHI SDS

अर्थप्राप्तीसाठी आपल्यातील कलाकौशल्ये पणाला लावणे यात काहीही गैर नाही. कलेच्या जोरावर उपजीविका करणाऱ्या जुन्या मराठी शाहीर कवींचा या संदर्भात उल्लेख केला जातो. आताच्या काळातही अनेक कवी मोठया बिदागीशिवाय कार्यक्रम करीत नाहीत, असे म्हणतात. त्यातून त्यांचा उदरनिर्वाह होतो. अर्थात असे असले तरी हे साहित्याचे प्रयोजन होऊ शकत नाही. कारण निव्वळ अर्थप्राप्तीसाठीच त्यांनी ती विद्या संपादन केलेली नसते. सुहास शिरवळकर, बाबा कदम यांसारखे लेखक फक्त साहित्य लेखनावर गुजरान करणारे आहेत. लेखन हा त्यांचा व्यवसाय आहे. अशा लेखकांच्या लेखनाचे प्रयोजन 'अर्थप्राप्ती' म्हणता येईल. पण सर्वच साहित्याबाबत असे म्हणता येणार नाही. आधुनिक काळातील केशवसुत, बालकवी, कुसुमाग्रज, अण्णा भाऊ साठे या साहित्यिकांना कितीशी अर्थप्राप्ती झाली, असा जरी विचार केला तरी या प्रयोजनाचे वास्तव लक्षात येईल.

तेव्हा, लेखकाच्या दृष्टीने सांगितले जाणारे 'अर्थप्राप्ती' हे साहित्याचे प्रयोजन होऊ शकत नाही. अर्थप्राप्ती काव्यलेखनाने साध्य होत असेलही; परंतु लेखक यासाठी लेखनास प्रवृत्त होतो असे म्हणता येणार नाही. वाचकाच्या दृष्टीने ते संभवत नाही. कारण कोणाला साहित्य वाचून 'अर्थप्राप्ती' झाल्याचे ऐकिवात नाही.

**व्यवहारज्ञान :**

व्यवहार याचा अर्थ लोकव्यवहार. वेगवेगळया जीवनप्रसंगांमधील माणसे कशी जगतात, वागतात, बोलतात इत्यादी गोष्टींचे लेखक नेमके, सूक्ष्म व प्रत्ययकारी ज्ञान देऊ शकतो; असे या प्रयोजनात सांगितले जाते. साहित्यिक आपल्या जीवनानुभवातून वाचकाला जीवनाचे दर्शन घडवीत असतो. यामुळे वाचकाच्या अनुभवकक्षा विस्तारतात. त्याच्या जाणिवा समृद्ध होतात. त्याचे उद्‌बोधन होते. मम्मटाला अभिप्रेत असलेले 'व्यवहारज्ञान' हे प्रयोजन या प्रकारचे आहे. यासाठी लेखक लिहितो व वाचक वाचतो, असे या प्रयोजनाच्या समर्थनार्थ सांगितले जाते. अर्थात साहित्याच्या माध्यमातून जीवनातील सत्याची जाणीव झाली; तरी हे काही ललितकृतींचे प्रयोजन नव्हे. तो फार तर त्याचा परिणाम मानता येईल. प्रयोजन आणि परिणाम यात भेद आहे. प्रयोजनात विशिष्ट हेतूची कल्पना समाविष्ट झालेली असल्याने एक ठाम असा निश्चितपणा असतो. परिणामाबाबत असा निश्चितपणा सांगता येत नाही. परिणाम हे साहित्यकृती करीत असलेले संस्करण असते; जे व्यक्तिसापेक्ष असते. त्यामुळे 'व्यवहारज्ञान' हे लेखकनिष्ठ व वाचकनिष्ठ प्रयोजन म्हणून साहित्याला लागू पडत नाही.



HRM MARATHI SDS

**अशुभनिवारण (शिवेतरक्षति) :**

प्राचीन साहित्यशास्त्रात अशुभनिवारण, इष्टकामप्राप्ती अशा काही प्रयोजनांचा समावेश झालेला आहे. त्या काळात काव्याची उपासना ही परमेश्वराची उपासना आहे, **काव्याने अशुभ गोष्टींचे निराकरण होते अशी श्रद्धा रूढ होती. या अर्थाने मम्मटांनी 'अशुभनिवारण' हे प्रयोजन सांगितले आहे.** याचा अर्थ काव्यनिर्मितीमुळे कवीचे अशुभनिवारण होते. येथे 'शिवेतरक्षति' म्हणजे जे अमंगल आहे, त्याचा नाश अभिप्रेत आहे. ''मयूर कवीने 'सूर्यशतक' लिहिले आणि त्याचा कुष्टरोग बरा झाला'' एक प्रकारे त्याचे अशुभनिवारण झाले. प्राचीन काळी भक्तीच्या पोटी हे प्रयोजन मान्य झाल्याचे दिसते. **शनिमाहात्म्य, व्यंकटेशस्तोत्र, गुरूचरित्र हे ग्रंथ पाहिले की त्यांचा हेतू 'अशुभनाश' हाच असतो, हे दिसून येते.** अर्थात या धार्मिक लेखनास साहित्य म्हणायचे की नाही, हा प्रश्न आहे. प्राचीन काळातील काही कवींनी 'अशुभनाश' व्हावा या हेतूने काव्य लिहिले आणि भाविक वाचकांनी तितक्याच श्रद्धाळू अंत:करणाने आपल्या संकटाचा परिहार व्हावा म्हणून वाचलेली आहे. प्राचीन काळातील काव्यप्रयोजन म्हणून 'अशुभनिवारण' सांगितले गेले. आजच्या काळात अशा प्रकारचा अनुभव दुर्मीळ असल्याने या प्रयोजनाला फारसे महत्त्व राहिले नाही.

**उच्चतर आनंद (सद्य:परनिर्वृत्तये) :**

मम्मटाने 'उच्चतर आनंद' असे साहित्याचे प्रयोजन सांगितले आहे. याचा अर्थ व्यावहारिक आनंदाच्या पलिकडे जाणारा अलौकिक प्रतीचा उच्चतर आनंद होय. **''विश्वनाथाने या आनंदानुभूतीचे वर्णन 'ब्रह्मानंदसहोदर' या शब्दात केले आहे.'' अन्य कोणत्याही लौकिक आनंदापेक्षा हा आनंद वेगळया कोटीचा, अलौकिक असा** असतो. काव्यापासून वाचकाला आनंद मिळतो, एक प्रकारचे समाधान प्राप्त होते; हा सामान्यत: मान्य केला जाणारा अनुभव आहे. पूर्वी काव्याची प्रेरणाच आध्यात्मिक असल्यामुळे हे प्रयोजन मानले जात असे. साहित्याद्वारे लेखक व वाचक यांना मिळणारा 'उच्चतर आनंद' हे प्रयोजन लेखक व वाचकनिष्ठ आहे.

**पत्नीचा प्रेमळ उपदेश (कान्तासंम्मित उपदेश)** :

कित्येकदा काव्याद्वारे नैतिक बोध केला जातो. **हा बोध ग्रंथाप्रमाणे 'प्रभुसंमित' किंवा 'मित्रसंमित' नसतो. पत्नी ज्या जवळकीने, ममत्वाने उपदेश करते तसे काव्य हळुवार उपदेश करते; असा अर्थ येथे मम्मटाला अभिप्रेत आहे.** 'कान्तासंम्मित उपदेश' म्हणजे प्रेमळ पत्नीने मधूर शब्दांनी केलेला हितोपदेश असतो. **''मनुष्याच्या अंत:करणाला कोमल स्पर्श करून भावनात्मक आवाहन करणे''** हे कान्तासंम्मित उपदेशाचे स्वरूप

स. रा. गाडगीळ यांनी सांगितले आहे. **प्रेमळ पत्नी ज्या जवळकीने, ममत्वाने, सहजतेने उपदेश करते तसे काव्य हळुवारपणे उपदेश करते, ही कल्पना येथे आहे. मात्र हे प्रयोजन देखील फलस्वरूप आहे.** पत्नीने केलेल्या प्रेमळ उपदेशाप्रमाणे साहित्यातून उद्‌बोधन होते हे मान्य केले, तरी त्याला प्रयोजनाचे स्थान देण्यात अडचणी निर्माण होतात. कारण लेखक या हेतूने लिहितो आणि वाचक वाचतो असे मानता येत नाही. 'पत्नीचा प्रेमळ उपदेश' हाही शेवटी साहित्याचा परिणाम आहे. हे प्रयोजन आज बरेचसे कालबाह्य झाले आहे. मुळात साहित्याकडून उपदेशाची अपेक्षा नसतेच. साहित्याने निखळ सौंदर्यानुभव द्यावा, अशी अपेक्षा असते.

**इतर साहित्य प्रयोजने**

मम्मटाने सांगितलेल्या साहित्य प्रयोजनांबरोबर **इच्छापूर्ती, जिज्ञासापूर्ती, विरेचन, आत्माविष्कार, अनुभवविश्वाची समृद्धी, स्वप्नरंजन, उद्‌बोधन, प्रचार, मनोरंजन आणि आनंद** या प्रयोजनांचा लेखकनिष्ठ व वाचकनिष्ठ दृष्टीने विचार केला जातो.

**इच्छापूर्ती :**

आधुनिक काळात मानसशास्त्राची बैठक देत 'इच्छापूर्ती' हे साहित्याचे प्रयोजन म्हणून सांगितले जाते. **माणसाचे मन लौकिक जीवनात नेहमी अपुऱ्या राहणाऱ्या इच्छा काल्पनिक जीवनात पुऱ्या करून घेते; या अर्थाने सिग्मंड फ्रॉइड या मानसशास्त्रज्ञाने 'दिवास्वप्न' (Day - dreaming)** ही कल्पना मांडली आहे. त्याच्या मते साहित्यकृती ही लेखकाच्या **व्यक्तिमत्त्वाचा, मनोविश्वाचा आविष्कार** असते. साहित्याने आपल्या अबोध मनातील **इच्छांची तृप्ती** होते. फ्रॉइडने आपला दिवास्वप्नांचा विचार **रंजक साहित्याच्या** तर स्वप्नांचा विचार गंभीर साहित्याच्या संदर्भात मांडला आहे. **साहित्यनिर्मिती जाणिवेच्या पातळीवर होत असली तरी तिची पाळेमुळे लेखकाच्या अज्ञात असलेल्या त्याच्या मनोविश्वात असू शकतात.** त्याची पूर्तता तो लेखनाच्या माध्यमातून करतो. या अर्थाने हे प्रयोजन **लेखकनिष्ठ** सांगितले जाते.

**फ्राइडच्या मते, वाचकाला आपल्या इच्छांची तृप्ती करण्यासाठी परिस्थितीत बदल घडवून आणणे शक्य झाले नाही, की तो दिवास्वप्न रंगवतो.** त्या वेळी त्याला लौकिकाचा विसर पडून तो इच्छापूर्तीचा अनुभव घेतो. तो आपल्या इच्छांची तृप्ती साहित्यकृतीच्या वाचनातून करून घेतो. फ्राइडने **दिवास्वप्नांची तुलना रंजनात्मक** साहित्याशी केली आहे. त्याच्या मते साहित्य एखाद्या दिवास्वप्नांसारखे असते. म्हणजे दिवास्वप्नांद्वारे जशी इच्छांची तृप्ती होते, तशी ती रंजक कांदबरीमुळे होते. कारण अशी कादंबरी ही एखाद्या दिवास्वप्नांसारखीच

असते. **''साहित्य हे दिवास्वप्नांप्रमाणे कार्य करते, ही फ्राइडची भूमिका मूलत: रंजनवादी आहे.''** असे वसंत पाटणकरांनी सांगितले आहे. फ्राइडचा हा विचार विशिष्ट प्रकारच्या रंजक साहित्यापुरताच मर्यादित आहे. म्हणून 'इच्छापूर्ती' हा साहित्याचा परिणाम आहे, प्रयोजन नाही; असे म्हणता येईल.

**जिज्ञासापूर्ती :**

**जिज्ञासा किंवा कुतूहल ही माणसाच्या ठिकाणची एक प्रबळ अशी जन्मजात प्रेरणा** आहे. सृष्टीतील प्रत्येक गोष्टीचे माणसाला नेहमीच कुतूहल वाटत आले आहे. या कुतूहलापोटीच तो सृष्टीची रहस्य शोधण्याचा, जीवनव्यवहाराची संगती लावण्याचा आणि कलाव्यवहारात रमण्याचा प्रयत्न करीत असतो. **मानवी जीवन व मन, त्यातील गुंतागुंत समजून घेण्याच्या जिज्ञासेपोटीच लेखक लिहितो व वाचक साहित्याचे वाचन करतो.** या अर्थाने 'जिज्ञासापूर्ती' हे प्रयोजन मानले जाते. **जर्मन समीक्षक 'शॉपेनहोअर'** यांचा या संदर्भात उल्लेख केला जातो. त्यांच्या मते, **''माणसाच्या मर्यादित जीवनात सर्वच गोष्टींचे आकलन होऊ शकत नाही. समजाव्यात अशा वाटणाऱ्या गोष्टींबद्दलची त्याची जिज्ञासा तशीच राहते. या जिज्ञासेची तृप्ती साहित्याद्वारा होते.''** म्हणजे ललितसाहित्याद्वारा आपणास मानवी जीवन आणि मानवी मनातील अज्ञात सूक्ष्मातिसूक्ष्म छटांची माहिती होते. **उदा. 'नटसम्राट'** नाटकातील कावेरी व आप्पासाहेब बेलवलकर, **'गारंबीचा बापू'** या कादंबरीतील बापू–अण्णा खोत–राधा–यशोदा अशा किती तरी व्यक्तिचित्रणातून मानवी मनाचे असंख्य अज्ञात पैलू दिसून येतात. एरव्ही हे **मानवी मनाचे व्यवहार समजून घेण्यासाठी मानसशास्त्रावरील कितीतरी ग्रंथ चिकाटीने वाचावे लागतील.**

**तेव्हा, वाचकाची जिज्ञासापूर्ती साहित्याद्वारा होते हे खरे. पण अशा जिज्ञासेसाठीच लेखक लिहितो आणि वाचक साहित्य वाचतो असे म्हणणे योग्य होणार नाही. म्हणून 'जिज्ञासापूर्ती' हे प्रयोजन मानता येणार नाही. तो वाटल्यास साहित्याचा परिणाम मानता येईल.** कारण अशा गोष्टींबद्दल जिज्ञासा असणारा वाचक ललित साहित्याकडे वळण्यापेक्षा त्या त्या शाखांकडे वळेल. उदा. मराठयांच्या इतिहासाबद्दल कुतूहल असणारा वाचक ऐतिहासिक कथा–कादंबरी वाचण्यापेक्षा इतिहास संशोधकांची पुस्तके वाचील. तसेच जिज्ञासा ही एक वैचारिक, ज्ञानात्मक जाणीव आहे. तिची एकदा तृप्ती झाली की माणूस पुन्हा त्या मार्गाकडे वळत नाही. पण एखादी साहित्यकृती आपण पुन: पुन: वाचतो. प्रत्येक वाचनातून आपल्याला नवा अनुभव मिळतो. 'जिज्ञासापूर्ती' हे प्रयोजन असते तर एकदा वाचलेले एखादे पुस्तक पुन्हा वाचले गेले नसते. त्यामुळे 'जिज्ञासापूर्ती' हे **साहित्याचे वाचकनिष्ठ प्रयोजन मानता येत नाही.** फार तर तो साहित्याचा परिणाम म्हणता येईल.



HRMMARATHI SDS

**विरेचन :**

विरेचन म्हणजे **भावनांचा निचरा होणे, साफ होणे.** करूणरसापासून दु:ख न होता आनंद होतो यासंबंधीचे हे विवेचन आहे. विरेचन म्हणजे **कॅथार्सिस.** ''प्रसिद्ध ग्रीक विचारवंत **ॲरिस्टॉटल** यांनी कॅथार्सिस (Katharsis) हा शब्द 'काव्यशास्त्रा'च्या सहाव्या प्रकरणात शोकात्मिकेची व्याख्या करताना वापरला आहे.'' ॲरिस्टॉटलच्या मते **शोकांतिका ह्या वाचक, प्रेक्षकांना शेवटी दु:ख न देता आनंद देत असतात. त्यामुळे वाचक पुन: पुन: त्या साहित्यकृतींचा आस्वाद घेतो.** हा आनंद वाचकांना भावनांच्या विरेचनातून प्राप्त होतो. शोकांतिकेच्या दर्शनामुळे माणसातील दया आणि करूणा या भावनांचे विरेचन होऊन त्याची चित्तवृत्ती आल्हाददायक होते. मन शांत होते, हलके होते. म्हणून विरेचन हेच साहित्यकृतीचे प्रयोजन ठरते. ''विकार आणि विवेक यांच्या संघर्षात विकारांचे दमन करण्याऐवजी अतिरिक्त भावनांना वाट करून देण्याचा शोकात्मिका हा निर्धोक मार्ग आहे, असे ॲरिस्टॉटलचे मत होते'' शोकात्मिकेने जागृत झालेल्या भावनांचे विरेचन होते.एखादे शोकात्म नाटक पाहताना भावनांचा आवेग अनावर होऊन वाचक प्रेक्षक अश्रू ढाळतो. परंतु तो वाचक अश्रू ढाळतानाही आनंद अनुभवीत असतो. हा आनंद नेमका कसला हे लक्षात घेतले तर प्रत्येक माणसाच्या मनामध्ये उचंबळून येणाऱ्या भावनांचे यथोचित विरेचन किंवा निचरा होणे आवश्यक असते. तसा निचरा झाल्याने त्याला आनंद मिळतो. **उदा. 'नटसम्राट' नाटक पाहताना माणसाच्या भावनांचे विरेचन होते. त्याला रिलिफ किंवा आनंद मिळतो.**

लेखक अंत:करणातील अतिरिक्त भावनांचे 'विरेचन' व्हावे म्हणून लेखन करतो. तर वाचक उचंबळून आलेल्या भावनांचे 'विरेचन' करण्यासाठी साहित्याच्या आस्वादाकडे वळतो. त्यातून लेखक व वाचकालाही आनंद मिळतो. यादृष्टीने विरेचन या प्रयोजनाचा विचार लेखक व वाचकाच्या अंगाने केला जातो. **परंतु 'विरेचन' हा साहित्याचा परिणाम आहे आणि परिणाम व प्रयोजन या दोन वेगवेगळया संकल्पना आहेत.** तेव्हा अगदी ओढाताण करूनही विरेचनास साहित्याचे प्रयोजन मानता येणार नाही. कारण लेखक किंवा वाचक असा विरेचनाचा हेतू मनाशी धरून साहित्याकडे वळतो असे म्हणणे, साहित्याची प्रकृती लक्षात घेता कठीण आहे.

**आत्माविष्कार :**

'आत्माविष्कार' (Self expression) ही संकल्पना पाश्चात्य समीक्षेतून आली आहे. साहित्याच्या क्षेत्रात **लेखक त्याला जाणवलेल्या सत्याचा, अनुभवाचा कल्पनारम्य आविष्कार करीत असतो.** त्याच्या भावना, विचार,

दृष्टिकोन प्रकट करीत असतो. म्हणजेच लेखक स्वानुभवासह आत्माविष्कार साधत असतो. **त्याची आवड, निवड, विचार, दृष्टिकोन, जीवनविषयक तत्त्वज्ञान, जीवनाबद्दलची अपेक्षा, अभ्यास, पूर्वतयारी इत्यादिंनी बनलेले त्याचे स्वत:चे खास व्यक्तिमत्त्व अप्रत्यक्षपणे त्याच्या साहित्यकृतीतून व्यक्त होत असते.** कवी–लेखकाच्या अंत:करणाला प्रतीत झालेल्या सत्याचा किंवा अनुभवाचा कल्पनारम्य आविष्कार करण्याचा हेतू असणे म्हणजे आत्माविष्कार होय. **कलेसाठी कला असा सिद्धांत मांडणारे डॉ. ब्रॅडले यांच्या मते, ''आत्माविष्कार हेच कवीचे एकमेव प्रयोजन होय''** आत्माविष्कारात कल्पनात्मक नवनिर्मिती त्यांनी गृहीत धरलेली आहे. कवीच्या दृष्टिकोनातून आत्माविष्काराचा म्हणजेच निर्मितीचा आनंद हीच साहित्याची अगर कलेची मूलभूत प्रेरणा असल्याचे सांगितले जाते.

कोणतीही साहित्यकृती ही एका व्यक्तिमनाने निर्माण केलेली असते. तो एक मानसिक व्यवहार असल्यामुळे **प्रत्येक कलाकृती स्वतंत्र बनते व तिच्यावर निर्मात्या कलावंताच्या मनाचे ठसे जाणवताना दिसतात.** यामुळेच सामाजिक वळण एकच असले तरी विजय तेंडूलकर आणि पु.ल.देशपांडे यांचे एकांकिकालेखन वेगळे दिसते. ''भोवतालच्या जीवनातील हास्यगर्भ भाव टिपून त्याचा एकांकिकेच्या रूपाने समर्थपणे आविष्कार करण्याचे कार्य मुख्यत: **पु. ल. देशपांडे** यांनी केले, तर गंभीर नाटयाचा आविष्कार **विजय तेंडूलकर** यांनी केला'' याचे कारण निर्मात्या मनांच्या स्वतंत्र मानसिकतेत सापडते. म्हणून **कवीच्या दृष्टिकोनातून आत्माविष्काराचा म्हणजेच निर्मितीचा आनंद हीच साहित्याची अगर कलेची मूलभूत प्रेरणा होय. या अर्थाने हे लेखकनिष्ठ प्रयोजन आहे.**

'आत्माविष्कार' हे प्रयोजन वाचकनिष्ठही समजले जाते. **लेखकाप्रमाणे वाचकही आत्माविष्काराच्या प्रेरणेने साहित्याच्या आस्वादाकडे वळत असतो.** वाचकाच्या ठिकाणी सौंदर्यवृत्ती आणि निर्मितीची सुप्त सर्जनशील प्रेरणा असते. **साहित्यकृती वाचताना वाचक स्वत:च्या कलाने तिची अर्थसंगती लावीत असतो.** हाच त्याचा आत्माविष्कार होय. वेगवेगळया वाचकांच्या मनात एकाच कलाकृतीची वेगवेगळी अर्थरूपे संभवतात; ती त्या त्या आस्वादक रसिकांच्या आत्माविष्काराच्या प्रक्रियेमुळेच!

**अनुभवविश्वाची समृद्धी :**

'अनुभवविश्वाची समृद्धी' हे लेखक व वाचकनिष्ठ प्रयोजन मानले जाते. लेखक जेव्हा आपल्या लेखनातून आत्माविष्कार साधत असतो तेव्हा तो **अनुभवदृष्टया अधिकाधिक समृद्ध** होत जात असतो. ही

HRM MARATHI SDS

अनुभवसमृद्धी गुणात्मदृष्टया अधिक समृद्ध असते. **लेखकाचा प्रत्येक अनुभव त्याला नवतेची जाणीव करून देत असतो. या अर्थाने हे लेखकनिष्ठ प्रयोजन होऊ शकेल.**

वाचकदृष्टयाही साहित्यातून अनुभवविश्वाची समृद्धी लाभत असते. साहित्यकृतीचा वाचकाकडून घेतला जाणारा **प्रत्येक आस्वाद हा एक नवा अनुभव असतो.** त्यातून वाचकाला अनुभवसमृद्धी लाभत असते. ''वाचनाचे फायदे सांगताना **गोपाळ गणेश आगरकरांनी 'वाचनामुळे माणूस जुना राहत नाही, नवा बनत जातो'** असे जे म्हटले आहे ते अनुभवविश्वाच्या समृद्धीच्या सूत्रालाही लागू पडते.'' **मात्र ही अनुभवविश्वाची समृद्धी हेतुपूर्वक नसते**, हे विशेष. **साहित्याच्या लेखन – वाचनाद्वारा ही समृद्धी आपोआप होत जात असते.** मात्र ती येण्यासाठी लेखन – वाचन होत नाही. या **समृद्धीचे स्वरूप गुणात्मक असते.** कलाकृती हा लेखकाच्या आत्मशोधाचा एक मार्ग असतो. या शोधातूनच त्याला अनुभवाची समृद्धी प्राप्त होत असते. असे साहित्य वाचून वाचकालाही ही समृद्धी प्राप्त होते.

**स्वप्नरंजन :**

माणूस हा स्वप्नाळू प्राणी आहे. माणसाची काही स्वप्ने निद्रावस्थेतील; तर काही दिवास्वप्ने असतात. मानवी जीवनाची दु:खमयता ही सर्वपरिचित वस्तुस्थिती असल्याने तो सतत अतृप्त व अस्वस्थ असतो. या अस्वस्थतेतून तो पलायनवाद स्वीकारतो. असेच काहीसे साहित्यनिर्मितीमध्येही असते. **जर्मन तत्त्वज्ञ शॉपेनहोअर आणि ना. सी. फडके यांनी या प्रयोजनाचा पुरस्कार केला आहे.**

माणसाचे जीवन दु:खमय आहे, असे दु:ख तो टाळण्याचा प्रयत्न करतो. मात्र त्याला वास्तवापासून दूर जाता येत नाही. एका अपरिहार्यतेतून तो जीवनापासून पलायनाचा मार्ग शोधतो. असा मार्ग त्याला साहित्यकृतीच्या निर्मितीत सापडतो. लेखक काल्पनिक जगातले अलौकिक विश्व निर्माण करून त्याद्वारे तो आपल्या अपुऱ्या इच्छांना पूर्तता देतो. **सर्वसाधारणपणे लोकप्रिय साहित्याचे स्वरूप स्वप्नरंजनात्मक असते.** उदा. ना. सी. फडके, बाबा कदम, सुहास शिरवळकर या लेखकांचे साहित्य स्वप्नरंजनात्मक आहे.

वाचकालाही दैनंदिन जीवनातील सुखस्वप्नांची पूर्ती साहित्य वाचनात मिळते. वाचक त्या साहित्याशी एकरूप होतो. त्याला इच्छापूर्ती झाल्याचे समाधान प्राप्त होते त्यामुळेच **माणसाला क्षणभर का होईना दु:ख विसरायला लावून आनंद देण्याचे कार्य साहित्यकृती करते; या अर्थाने हे वाचकनिष्ठ प्रयोजन सांगितले जाते.**

HRMMARATHISDS

असे असले तरी स्वप्नरंजन हे लेखकनिष्ठ व वाचकनिष्ठ प्रयोजन आहे; असे म्हणता येत नाही. **जगातले कल्पनारम्य, अद्भूतरम्य साहित्य प्राधान्याने स्वप्नरंजन या प्रयोजनातून उद्भवले असले तरी त्याला अभिजात, श्रेष्ठ कलाकृती मानत नाही.** उदा. 'हॅरी पॉटर' ही लोकप्रिय कांदबरी असली तरी तिची तुलना **शेक्सपियरच्या साहित्यकृतींशी** होऊ शकत नाही. तसेच लेखक व वाचक हे स्वप्नरंजनाचा हेतू मनात धरून साहित्याकडे वळतात आणि याद्वारे आनंदाची अपेक्षा करतात असे म्हणणे चुकीचे ठरेल. मराठीतील नामवंत लेखक – कवी फक्त स्वप्नरंजनासाठी लिहिते झाले असे म्हणणे अन्यायाचे ठरेल. म्हणून असे म्हणता येईल की **दुय्यम दर्जाची लोकप्रिय साहित्यनिर्मिती व आस्वाद यांच्यामागे हे प्रयोजन असू शकेल; पण अभिजात साहित्याच्या व्यवहारात हे प्रयोजन संभवू शकत नाही.**

**उद्बोधन :**

बोध याचा अर्थ सामान्यत: उद्बोधन, माहिती देणे असा आहे. बोध म्हणजे काहींच्या दृष्टीने नीतितत्त्व, आध्यात्मिक तर काहींच्या दृष्टीने नव्या मूल्यांचा बोध असाही आहे. मात्र उद्बोधन म्हणजे बोध नव्हे; तर खोल, समृद्ध व्यापक अशी जागृती. साहित्याचे मानवी मन आणि जीवन हेच लक्ष्य असल्यामुळे त्याच्या विविध अंगाचे दर्शन साहित्यातून होते. असे लेखन वाचकांच्या ठिकाणी जीवनाविषयीची एक समृद्ध जाणीव विकसित करीत जाते. त्यातून वाचकांचे मन प्रगल्भ होते. वाचकांच्या मनाचे उद्बोधन साधले जाते. उदा. व्यासांचे महाभारत, संत ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी इत्यादी साहित्यकृतींचा या संदर्भात उल्लेख करता येईल. अशा साहित्यकृतीतून जीवनाचा लावलेला प्रगल्भ अर्थ वाचकांच्या मनालाही प्रगल्भ करीत असतो.

साहित्यातून समाजाला काही संदेश, बोध मिळावा; अशी सर्वसाधारण वाचकाची अपेक्षा असते. मुळात बोधाचे स्वरूप नेहमीच उपदेशाचे मानले गेल्यामुळे साहित्याकडून बोधाची अपेक्षा केल्यास लेखकाची भूमिका आपोआप उपदेशकाची बनते. त्यामुळे लेखकाची निर्माता कलावंत म्हणून असलेली भूमिका धोक्यात येते. तेव्हा साहित्याने या बोधाच्या व्यवहारात पडू नये असे कलावादी समीक्षक भूमिका घेतात. तर उद्बोधन जीवनास उपयुक्त असते असे जीवनवादी समीक्षक भूमिका मांडतात.

या दोन्ही टोकांच्या भूमिकांतून मध्यम मार्ग काढला जातो, तो म्हणजे साहित्याद्वारा केलेला बोध हा अप्रकट असावा. ''म्हणजे साहित्याचे साहित्यत्व अबाधित राखून बोध करायचा तर तो छुप्या रीतीने करावा. त्याचे स्वरूप साखरेचा लेप दिलेल्या कडू कोयलेनच्या गोळीसारखे असावे, असे 'विदग्ध वाङ्मय' निबंधात



HRM MARATHI SDS

हरिभाऊ आपटे यांनी म्हटले आहे.'' साखरेच्या लेपामुळे त्या गोळीचा कडूपणा जसा गिळणाऱ्याला जाणवत नाही आणि त्याची विकृती नाहीशी होते; तसे स्वरूप साहित्यातून होणाऱ्या बोधाचे असावे. उदा. हरिभाऊ आपटे यांच्या सामाजिक कादंबऱ्या हे याचे उत्तम उदाहरण असून त्यातून वाचकांना बोध होतो; पण लेखक तसे जाणवू देत नाही.

साहित्याद्वारा उद्‌बोधन होते, हे मान्य केले तरी त्याला प्रयोजनाचे स्थान देण्यात अडचणी निर्माण होतात. बोधाचा नीतीशी, चांगल्या – वाईटाच्या कल्पनेशी संबंध येतो. परंतु या नीतिकल्पनांचा अर्थ स्थळ–काळ–व्यक्तिसापेक्ष बदलत असतो. त्यामुळे लेखक व वाचकदृष्टया हे प्रयोजन मानता येईल असे वाटत नाही. अ.वा.कुलकर्णी यांनी ''वाचकांचे उद्‌बोधन व्हावे म्हणून लेखक लिहितो असे म्हणणे जितके गैर ठरेल तितकेच वाचक आपले उद्‌बोधन व्हावे म्हणून साहित्य वाचतो असे म्हणणेही गैर ठरेल. म्हणून उद्‌बोधन हा ही शेवटी साहित्याचा एक व्यापक परिणाम आहे असे म्हणावे लागेल.'' उद्‌बोधन हे साहित्याचे प्रयोजन म्हणून मान्य करता येत नाही.

**प्रचार :**

या प्रयोजनाचा लेखकनिष्ठ विचार करताना, स्वत:ला मान्य झालेल्या तत्त्वाचा प्रचार करण्यासाठी लेखक लेखन करतो असे म्हटले जाते. त्यामागे विशिष्ट परिणामांची अपेक्षा असते. त्यामुळे साहित्याला साधनाचे स्वरूप प्राप्त होते आणि ते साहित्य प्रचारकी होते. प्रचारी साहित्यातून एखादे तत्त्व, भूमिका, यांचा प्रसार व्हावा; अशी अपेक्षा असते. ''विशिष्ट परिणामांची अपेक्षा ठेवून लिहिले जाणारे साहित्य असत नाही असे नाही. तिथे प्रयोजन आणि परिणाम समानार्थक बनले असतीलही; पण अशा साहित्याला प्रचारी साहित्यच म्हटले जाते.'' प्रचारामुळे साहित्यकृतीचे स्वरूप यांत्रिक व हिशेबी होऊ लागते. आशय आणि आविष्कार यांच्यातील लवचिकपणा नष्ट होतो. त्यातील सूचकता, अनेकार्थता, विशिष्ट लेखन सौंदर्य इत्यादी कलात्मक म्हटले जाणारे विशेष धोक्यात येतात. असे साहित्य मग स्थळ–काळसापेक्ष बनते. त्यात सार्वत्रिक अशी आवाहनक्षमता निर्माण होत नाही. त्यामुळे मग 'प्रचार' हे साहित्याचे लेखकनिष्ठ प्रयोजन मानले तर साहित्याचे साहित्यत्वच धोक्यात येते.

कोणताही लेखक अंतिमत: कुठल्यातरी विचारांना प्रमाण मानत असतो. त्यांचे प्रत्यंतर त्याच्या लेखनातून जाणवते. अनेकदा एखाद्या साहित्यकृतीतून लेखकाच्या अनुभवाला मुख्य स्थान मिळते आणि साहित्यकृतीचे साहित्यत्वही कायम राहून प्रचार साधला जातो असे दिसते. उदा. साने गुरूजी, वि.स.खांडेकर

यांच्या साहित्यावर गांधीवाद, समाजवादाचा प्रभाव जाणवतो. मात्र या लेखकांनी त्यांच्या साहित्याला कुठेही प्रचारकी रूप येऊ दिले नाही. त्या अर्थाने आपल्या विचारांशी प्रामाणिक राहून आपल्या साहित्यानुभवांना आविष्कृत केले आणि साहित्याचे साहित्यमूल्य अबाधित राहील याची काळजी घेतल्यास व्यापकार्थाने 'प्रचार' हे लेखकदृष्टया साहित्याचे प्रयोजन मानता येईल. पण हा नुसता व्यापकार्थ होणार नाही तर लादलेला अर्थ होईल. कारण मग प्रचार व आविष्कार हे शब्द समानार्थक मानावे लागतील. तेव्हा असा अर्थ या संदर्भात न घेणेच योग्य ठरेल. कारण आविष्कारात लेखकाचे व्यक्तिमत्त्व स्वतंत्र असते आणि प्रचारात परतंत्रतेमुळे ते साचेबंद होते; हे ही येथे लक्षात ठेवले पाहिजे. अ. वा. कुळकर्णी यांनी या संदर्भात समर्पक उदाहरण दिले आहे. ते म्हणतात, ''आपल्याकडे निवडणुकांच्यावेळी विविध राजकीय पक्षांकडून प्रचाराच्या दरम्यान गायली जाणारी गाणी प्रचारी साहित्याचे सर्वपरिचित उदाहरण म्हणता येईल. उदा. कॉंग्रेस पक्षाच्या वतीने महाराष्ट्रात प्रसिद्ध कवी ग.दि. माडगुळकर यांनी मुद्दाम तयार केलेली गाणी म्हटली जात. त्यात कॉंग्रेसचा प्रचार जरूर असे, पण 'कवी माडगूळकर' मात्र नसत.'' वाचकदृष्टया प्रचार हे प्रयोजन मानता येत नाही.

**मनोरंजन :**

साहित्याच्या सर्वच प्रकारात मनोरंजनपर साहित्याची निर्मिती मोठया प्रमाणात होताना दिसते. घटकाभर करमणूक करणे; या प्रेरणेने मनोरंजनपर साहित्य निर्माण होते. कुतूहल, उत्कंठा, गुंतागुंत यांचे ताण पेलत अखेरीस त्यातून सुटकेची स्थिती अनुभवणे यात माणसाच्या मनाला एकप्रकारचे समाधान लाभते. त्यातून माणसाचे मनोरंजन होते. तेव्हा मनोरंजनाची गरज हा एक खास मानवी विशेष आहे. जीवनदर्शनाची खोली, उत्कटता इ. वैशिष्टे तेथे लक्षात घेतली जात नाहीत. त्यामुळे मनोरंजन हे प्रयोजन लेखक वा वाचक यांच्या दृष्टीने सर्वच साहित्याला लावता येणारे नाही. शिवाय 'मनोरंजन' या शब्दातील 'रंजन' या शब्दाचा अर्थ करमणूक, मौज, आनंद असा आहे. या शब्दाचे अर्थ जाणत्या व अजाणत्या माणसांच्या बाबतीत बदललेले असतात. उदा. बाबुराव अर्नाळकर, गुरूनाथ नाईक यांच्या गुप्तपोलिसी रहस्यमय कथा – कादंबऱ्या आणि श्री. ना. पेंडसे, भालचंद्र नेमाडे यांच्या कलात्मक कादंबऱ्या ह्या एका समान पातळीवर मनोरंजन साधतात, असे म्हणता येणार नाही. या दोन्ही ठिकाणी वेगवेगळया दर्जाच्या अभिरूचीचे रंजन होताना दिसते. तेव्हा मनोरंजन आणि साहित्यिक अभिरूची यातील संबंध महत्त्वाचा असतो. कारण लेखक आणि वाचक या दोघांच्याही साहित्यिक अभिरूचीवर त्यांच्या मनोरंजनाचे स्वरूप अवलंबून असते.



HRM MARATHI SDS

सर्वसाधारणपणे मनोरंजनपर म्हटले जाणारे साहित्य दुय्यम दर्जाचे मानले जाते. कारण त्यात रंजनाच्या बेतलेल्या आडाख्यांवर भर असतो. वाचकांची पसंती कशास मिळेल याचीच त्यांना सतत जाणीव ठेवावी लागते. निखळ कलाविष्काराची ओढ त्यामागे नसते. अ. वा. कुळकर्णी यांनी 'मनोरंजन' हे दुय्यम दर्जाच्या साहित्यकृतीचे प्रयोजन आहे, असे म्हटले आहे. ते म्हणतात, ''मनोरंजनाचे प्रयोजनसूत्र सर्वच साहित्य निर्मितीसाठी लावता येणार नाही. काही विशिष्ट 'मागणी तसा पुरवठा' या न्यायाने निर्माण होणाऱ्या ललित साहित्यामागे असे प्रयोजन लेखक व वाचक या दोन्ही बाजूंनी वास करते असे म्हणता येईल.'' 'मनोरंजन' हे वाचकनिष्ठ व लेखकनिष्ठ प्रयोजन मानता येत नाही.

**आनंद :**

'आनंद' हे साहित्याचे सर्वश्रेष्ठ प्रयोजन मानले जाते. ललित साहित्य हे रसिकाला आनंद देण्याच्या हेतूने निर्माण होते. हा आनंद जीवनातील अन्य आनंदाहून भिन्न असतो. त्याची जीवनातील अन्य आनंदाशी तुलना करता येत नाही. इतका तो अलौकिक असतो. लेखकाच्या दृष्टीने निर्मितीचा उच्चतर आनंद, तर वाचकांच्या दृष्टीने आस्वादाचा उच्चतर आनंद असे त्याचे दुहेरी स्वरूप आहे.

कवीचा निर्मितीच्या वेळी केवळ आपल्या अंत:करणाला प्रतीत झालेल्या सत्याचा, अनुभवाचा कल्पनारम्य आविष्कार करणे एवढाच हेतू असतो. या नवनिर्मितीमध्ये एक अपूर्व असा आनंद असतो. या अपूर्व आनंदाचा सहृदय वाचकाला लाभ करून देणे हे कवीचे रसिकाच्या दृष्टीने प्रयोजन असते. कवीच्या दृष्टिकोनातून आत्माविष्काराचा म्हणजेच निर्मितीचा आनंद हीच साहित्याची मूलभूत प्रेरणा असते.

वाचकाच्या दृष्टीनेही 'निर्मितीचा आनंद' या घटनेकडे पाहता येते. वाचकाच्या ठिकाणीही नवनिर्मितीची प्रेरणा असते. पण प्रत्येकालाच अंतरंगातील भावना प्रगट करता येतातच असे नाही. त्यामुळे साहित्यवाचनातून त्यांच्या भावनांना वाट मिळते आणि त्यालाही अपूर्व असा आनंद प्राप्त होतो. या आनंदात विविध घटक असतात. पुन:प्रत्यय, जिज्ञासातृप्ती, जीवनाचे नवदर्शन, मनाचे उद्‌बोधन इ. सर्व जाणिवांचे एकत्रीकरण वाचकाच्या ठिकाणी होत असते. यापैकी कोणत्या घटकाचा प्रभाव रसिकावर पडावा, हे त्याच्या मनाच्या पूर्वस्थितीवर अवलंबून असते. सर्व लौकिक अनुभव बाजूला सारून ज्याला स्थळ, काळ, व्यक्तिनिरपेक्ष शुद्ध भावनेची प्रतीती येईल, त्याला अपूर्व अशा आनंदाचा लाभ होईल. हाच काव्यानंद होय. वाचकाच्या दृष्टीने हेच



HRMMARATHISDS

साहित्याचे प्रयोजन होय. संस्कृत विचारवंत विश्वनाथाने या अनुभूतीचे वर्णन 'ब्रह्मानंदसहोदर' या शब्दात केले आहे.

**समारोप :**

प्रयोजन म्हणजे हेतू किंवा उद्देश. लेखक आणि वाचकाच्या मनात प्रत्येकी साहित्यनिर्मिती आणि आस्वादामागे जे उद्दिष्ट असते; तेच साहित्याचे प्रयोजन होय. साहित्याची निर्मिती व आस्वाद प्रक्रिया का होते? हा एकूण साहित्य व्यवहारातील महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाच्या चर्चेतून साहित्याचे प्रयोजन काय? हा प्रश्न निर्माण झाला. साहित्याची निर्मिती आणि आस्वादामागे निश्चित असा हेतू असल्याने त्याचा शोध घेणे म्हणजेच साहित्याचे प्रयोजन शोधणे होय. लेखकाच्या बाजूने प्रयोजनांचा विचार करताना काही साहित्यकृतींमधून आत्माविष्कार साधलेला दिसतो, काहींमधून अनुभवविश्वाची समृद्धी प्राप्त होते. काहींमधून जीवनदर्शन घडते, काहींमधून रचनात्मकतेचा आनंद मिळतो तर काहींमधून संवेदनांचा आनंद मिळतो. या अर्थाने साहित्यविचारात लेखकनिष्ठ प्रयोजनांचा विचार केला गेला. रसिकनिष्ठ प्रयोजनांचा विचार करताना वेगवेगळया व्यक्तींच्या कलानुभवामागील प्रयोजन वेगळे असते. कोणी रंजनासाठी, कोणी बोधासाठी, कोणी आनंदासाठी तर आणखी कोणी अन्य कारणासाठी कलाकृतीचा अनुभव घेत असतो. साहित्याच्या या लेखकनिष्ठ व वाचकनिष्ठ प्रयोजनांचा विचार पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांपासून संस्कृत मीमांसकांपर्यंत अनेकांनी आपापल्या जीवनविषयक दृष्टिकोनानुसार केला आहे. त्यांनी साहित्याच्या सौंदर्यात्मक अंगाबरोबर ज्ञानात्मक, नैतिक बाजूनेही प्रयोजनांचा विचार करून काही प्रयोजने निश्चित केली आहेत.

मम्मटांनी 'यश, द्रव्यलाभ, व्यवहारज्ञान, अशुभनिवारण, उच्चतर आनंद आणि पत्नीचा प्रेमळ उपदेश अशा प्रयोजनांचा निर्देश केला आहे. यातील 'आनंद' हे सर्वश्रेष्ठ प्रयोजन आहे. 'अशुभनिवारण', 'पत्नीचा प्रेमळ उपदेश' इत्यादी प्रयोजने आज कालबाह्य झाली आहेत. 'यश' पूरक प्रयोजन आहे. अर्थप्राप्ती, व्यवहारज्ञान ही प्रयोजने साहित्याला लागू पडत नाहीत.

याशिवाय इच्छापूर्ती, जिज्ञासापूर्ती, विरेचन, आत्माविष्कार, अनुभवविश्वाची समृद्धी, स्वप्नरंजन, उद्‌बोधन, प्रचार, मनोरंजन आणि आनंद ही साहित्यिक प्रयोजने साहित्यविचारात सांगितली गेली आहेत. तथापि इच्छापूर्ती, उद्‌बोधन, जिज्ञासापूर्ती, विरेचन, प्रचार ही प्रयोजने नसून साहित्याचा परिणाम आहेत. स्वप्नरंजन, मनोरंजन ही प्रयोजने दुय्यम दर्जाची लोकप्रिय साहित्यनिर्मिती आणि आस्वादामागे सांगता येतात.

अभिजात साहित्याच्या व्यवहारात ही प्रयोजने संभवत नाही. अनुभवविश्वाची समृद्धी हे लेखकनिष्ठ व वाचकनिष्ठ प्रयोजन मानता येईल. आत्माविष्कार हे प्रयोजन आजच्या काळातही लेखक व वाचकाच्या दृष्टीने तितकेच महत्त्वाचे आहे. साहित्याचे सर्वश्रेष्ठ प्रयोजन सांगायचे म्हटल्यास लेखन व वाचनातून मिळणारा 'उच्चपातळीवरचा आनंद' हेच होय.

.............................................................................................................................

**विषय शिक्षक**

डॉ. संजय शिंदे

मराठी विभाग प्रमुख

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

HRM MARATHI SDS